# आधारवड

## श्रीमती उज्वलाकाकू पद्मावार

सकाळी ५ वाजता उठून व्यायाम करते. २० वर्षे झालीत अजून करते. लग्नाच्या अगोदर मी १ नातींना स्वेटर करून दिले. लग्न झाल्या नंतर २५ स्वेटर केले असतील. घरच्या सगळ्यांना व प्रेमाच्या लोकांनी करून मागीतले त्यांना. एक माझ्या नातीच्या मित्राच्या मुलांनी स्वेटर करून मागीतले तो चीफ साहेब होता. बंजारी होता. त्याने लोकर आणून दिली. स्वेटर झाल्यावर स्वेटर व उरलेली लोकर त्याला दिली. स्वेटर चांगले म्हणून म्हटले व उरलेली लोकर घेऊन गेला असे असतात महाभाग!

अनुजा (सुनबाई) ही मला पातळ तर इतके आणते की तिला आता नको म्हणावे लागते. चपला जुन्या झाल्या की न सांगता घेऊन येते. अजून काय पाहिजे. बाहेरचं खात नाही म्हणून वराटे वडे, दही वडे, कचोरी, डोसे मला घरी करून देते आणखी काय अपेक्षा करतो सुनांकडून! अशा जर सर्व सुना मिळाल्या तर कशाला सासवांना सासूसासरे कशाला वृद्धाश्रमात जायची पाळी येते.



## आधारवड

### श्रीमती उज्वलाकाकू पद्मावार

संमृध्द केले जीवन
सोसुनी सुख दुःखाचे टक्के टोणपे
सांगा बरे सदा प्रसन्न हासरे
अपुल्याच भोवतीचे व्यक्तिमत्व ते कोणते??
सुसंगती सदा घडो
असा प्रत्यय देणारी
साधी सरळ सौजन्यशील
वृंदावन सोसायटीत रमणारी
लाभावा वाटतो स्नेह त्यांचा
अशी साक्षात वात्सल्यमूर्ती
कोणाची बरे असेल अशी कीर्ति
नाव उज्वला काकूंचे घेताच
आली ना मनामध्ये स्फूर्ती !!
पद्मावार कुटुंबालाच नव्हे तर
अख्ख्या सोसायटीला अभिमान
हस्तलिखितातील त्यांचे लिखाण
माहितीपर विषयांची जणू सुरेख कमान !!
जीवनप्रवास त्यांचा कसा कसा घडला
हे जाणूनी घेण्यास सुसंवादाची साधली लय
एका एका आठवणींचा पदर हळूहळू उलगडला
मन मोकळ्या शब्दांनीच टिपला त्यांचा परिचय !!

गुलमोहर मासिकासाठी- हस्तलिखितासाठी आपण एक उपक्रम घेत आहोत आणि तो म्हणजे आपल्या परिसरातील जेष्ठ, अनुभव संपन्न अशा व्यक्तिमत्वांची सगळ्यां ओळख करून देणे. जेणेकरून प्रत्यक्ष परीचय नसला तरी त्य माहिती आपल्या पर्यंत पोहचते आणि त्यांच्या संमृध्द, तृप्त जीवनातील आठवणींचे आपणही साक्षीदार होवून त्यातील काही गुण आत्मसात करण्याचा आपण प्रयत्न करू शकतो

त्याचा आपल्याला फायदाच होणार; आजकाल असे सल्ले देणारे खूपच कमी लोक असतात.

अशाच आदर्शवत असणाऱ्या उज्वला काकू पद्मावार यांचे मनोगत त्यांच्याच तोंडून आपण आज ऐकणार आहोत!! त्यांनी प्रसंगोचित दिलेला संदेश लक्षात ठेवण्याचा प्रयत्न आपण नक्कीच करणार; होय ना?? काकू सर्वप्रथम तुमचं लहानपण कुठे, कसं गेलं? जन्म कोणत्या गावी झाला ते सांगा.

माझा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस तालुक्या-मधील "सारवरा" या एका लहानशा खेड्यात १०।४।१९२९ रोजी झाला. माझे पूर्वाश्रमीचे नाव कु. कमल गोपाळराव बिजमवार!! मला ६ बहिणी आणि १ भाऊ, भावंडासोबत बालपण मजेत गेलं. गाव खूपच लहान होतं म्हणजे तिथे शाळा तिसरीपर्यंतच होती. मी तिसरा वर्ग पास झाल्यावर घरीच होती. पण मला शिकण्याची ओढ होती. ही गोष्ट माझ्या मोठ्या बहिणीच्या यजमानांच्या (भाऊजींच्या) लक्षात आली. त्यांनी घरच्यांना शिक्षणाचं महत्त्व पटवून दिलं आणि यवतमाळला माझी मावशी होती तिच्याकडे शिक्षणासाठी माझी रवानगी झाली. आणि १०वी पर्यंतचे शिक्षण मग बिनाविरोध सुरू झाले.

शाळेतील काही आठवणी असतील तर त्या सांगा ना काकू?

बघ शाळेतील आठवणीत रमता रमता मला शाळेतील ते दिवस डोळ्यासमोर दिसू लागलेत बघ A.V. स्कूल मध्ये पाचवीत असतांना मी कबड्डी स्पर्धेत भाग घेतला. तीन वर्षे सतत खेळून कप्तानपदही भुषविले! विशेष म्हणजे त्या काळात हाफ पॅन्ट शर्ट घालून मी खेळायचे. सगळ्यांना खूप कौतुक वाटायचे; कबड्डी मध्ये चॅम्पियन कप मिळवून दिल्याबद्दल शाळेकडून शाबासकी तर मिळालीच पण अकोला येथे मोठा कार्यक्रम होवून मला गालीच बक्षिस मिळाला.

मग पुढे १९४५ साली मी उत्तमप्रकारे दहावी पास झाले. गणित विषयात मला प्राविण्य मिळालं. सगळ्यांनाच खूप आनंद झाला. पण पुढचं शिक्षण मात्र थांबलं. शाळेत लगेचच शिक्षिकेची संधी आली होती परंतु भाऊला माझे

नोकरी करणे पसंत नव्हते काय करणार?

संसाराविषयी तुमची काही स्वप्ने, विचार असतीलच जे की प्रत्येक तरुणीच्या मनात असतातच, त्याबद्दल काही सांगा.

काकू- हो सांगते ना, तो काळ मी कसा विसरेन? माझ्या वडिलांकडे भरपूर शेती-वाडी होती. नोकरी करणाऱ्या मुलापेक्षा त्यांनी शेतकरी जावईच पसंत केला. आमच्या गावा जवळच दिग्रस येथील पद्मावार कुटुंबात माझा विवाह झाला. माझ्या सासऱ्यांना दोन मुले. मोठे भासरे- जाऊबाई व त्यांची मुले लहान चिरंजीव बालाजी माझे जीवनसहचर झाले. नवीन वातावरणात मी हळूहळू रुळले. आमचाही संसार फुलू लागला. मला दोन मुलगे मोठा मोठा श्याम आणि धाकटा गजानन भरलेलं गोकुळ होतं. माझं सासर म्हणजे आला गेला पै-पाहुणा. मला उसंत म्हणून अशी नव्हती. कधी कधी मी थकून जायची पण सांगणार कोणाला? बाबांनी लग्नाच्या वेळेसच सांगितले की आता सासर हेच तुझं खरं घर!! नशातच दिग्रसला मुलींसाठी शाळा काढण्याचं ठरत होतं. मला तिथे सहज नोकरी करता आली असती पण!! मी शिक्षिकेची नोकरी करणं सासरी मानवणार नव्हतं!! तो ही विचार सोडला.

पण मग घर संसार या व्यतिरीक्त विरंगुळा म्हणून म्हणा किंवा समाजसेवेसाठी घरी राहूनच कांहीतरी केलं असणार? कारण तुमचा पिंड धडपडणारा दिसतो. तुम्ही काही स्वस्थ बसल्या नसणार!!

आमच्या गावात एक महिला मंडळ होतं. त्याची सदस्य झाली. हळूहळू सेक्रेटरी मग अध्यक्ष असा प्रवासही केला. त्या कालावधीत बरेच नवीन उपक्रम मी सुरु केले. मला कलाकुसरीचे सामान करायला खूप आवडायचे. साखरेची भांडी, मोत्याच्या रांगोळ्या टाकाऊतून टिकाऊ वस्तू लोकरीचे विणकाम, भरतकाम असे किती किती जमलेल्या बायकांना शिकविले. त्यातून काही जणी तर व्यवसाय देखिल करु लागल्या. चला आपल्यामुळे त्यांना धनचालना मिळाली हे समाधान मला पुरेसे होते.

मला वाचनाची आवड होती. आईकडून खूप स्तोत्र

प्रार्थना, भजन ऐकून ऐकून पाठ झाली होती. त्याचा फायदा भजनी वर्गात जातांना झाला. कुणाकडून काही शिकण्यासारखे असेल तर ते शिकून घेण्याचा माझा स्वभाव! असे माझे दिवस आनंदात जात होते. मैत्रिणींच्या मदतीने हस्तलिखित काढलं.

काकू - काकांबद्दल दोन शब्द ऐकायला आवडतील मुलांना तर तुमच्यारूपाने खुपच छान आई मिळाली. त्याबद्दल काही थोडं...

काकू - काकांबद्दल सांगायचं तर हे खूपच प्रेमळ होते. पण घरातील कर्मठ वातावरणामुळे थोडे कडकही होते. अर्थात त्यांचे सोवळे - ओवळे मी पण कधी स्विकारले ते माझं मलाही कळलं नाही. पण मी पण त्यांच्या प्रमाणेच नियम पाळणारी बनले. माहेरी पाठवत नव्हते एवढं मात्र खरं. मुले मोठी होत होती. मोठा श्याम घरची शेती बघू लागला. धाकटा गजानन अभ्यासात हुषार नागपूरला शिकून व्हेटरनरी डॉक्टर झाला. पुण्यात च्यांगल्या कंपनीत नोकरीला आहे. दोन्ही मुलांचे विवाह थाटात पार पडले. मोठी सून संध्या आणि धाकटी अनुजा अगदी मना सारख्या गुण्या गोविंदाने राहतात. नातवंडाचेही आगमन झाले. आई - वडील आजीचा - मोठ्या आईचा मान राखतात. ते पाहून आपसूकच त्यांनाही माझा लळा लागला. एकूण घरातील वातावरण सामंजस्याचे आहे. माझा मुक्काम कधी दिग्रस तर कधी पूणे येवून जावून असायचा. काकांसोबत पुण्याच्या आजुबाजुची महत्वाची ठिकाणं पाहिली. योग येत गेला तस तशा जगन्नाथ पुरी नेपाळ कलकत्ता काशी तिरूपती अष्टविनायक अशा यात्रा सुध्दा झाल्या.

सध्या तुमचं रुटीन कसं काय सुरु आहे? तुमच्या मनात आणखी काही कल्पना योजना आहेत का ज्या तुमच्या मार्गदर्शनाखाली आम्ही करु शकू.

काकू - जवळ जवळ ६।७ वर्षे झालीत मी येथे या वृंदावन सोसायटीत गजाननकडे राहत आहे. माझ्या वैयक्तिक

५

आयुष्यात मी खूप समाधानी आहे. मुलगा, सून, नातं भरभरून प्रेम मिळतं. कुठलीही गोष्ट हवी असल्यास त ती इच्छा पूर्ण करतात. सून अनघा तर दुधात साखर विरघळावी तशी आमच्या सगळ्यांमध्ये मिसळून गेली. मा सोवळं ओवळं जातीने बघते. थोरली संध्या देखिल माझं हवं नको ते स्वतः काळजीने करते. घरात सात्विक आनंदाचं वातावरण आहे. आणि सांगायचं म्हणजे मी माधुरीताई गीता वर्गास जात असे. प्रधानांकडे अठरा अध्यायांचा वर्ग करीत असे. गुरुपौर्णिमेला आम्ही छोटासा कार्यक्रम करीत असतो. आमच्या सोसायटीत आमच्या घरासमोरच गोपाळ मंदिर आहे. तिथे रामदासांचे श्लोक, भजन असे सुरु असतात तिथे मी हमखास जातेच. सगळ्या मैत्रिणी लहान मो वयाच्या पण खूपच काळजी घेतात माझी. वाचनालय सहज उपलब्ध आहे. त्याचाही थोडा लाभ घेते.

आजच्या समाजात कारणे काहीही असोत ए कुटुंब व्यवस्थेवर वाईट परिणाम झालेला दिसतो. त्याबद्दल तुम्हाला वाटतं? नवीन पिढीला तुम्ही उपदेशाचे दोन शब्द कोणते सांगाल?

काकू - T.V. वरचा प्रभाव लोकांच्या जीवनावर भरपूर. दुःखाची गोष्ट ही आहे की ते एक प्रसाराचे चांगले माध्यम असूनही थिल्लर विघातक मालिका दाखवल्या जातात. घरातील सगळेच त्याच्या, मोबाईलच्या, कॉम्प्युटरच्या आहारी गेलेत. तर थोडा विचार करून काय चांगलं वाईट ते स्विकारता आलं पाहिजे.

वृध्दाश्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचं वाईट वाटतं. आई वडीलांना घरातच व्यवस्थित मान द्या. तुमच्या आनंदातच त्यांचे समाधान असते. हे विशेषता घरच्या गृहिणीने लक्षात ठेवले पाहिजे. मुले तर अनुकरणशील असतात. त्यांच्या समोर आपले वागणे आदर्श म्हणून असावे पाहिजे.

समस्या कोणाला नसतात? सगळ्यांनी विचारांती निर्णय

घेतला पाहिजे. तरच थोडी आशादायक परिस्थिती निर्माण होईल!!

काकू अगदी बरोबर बोललात. तुमचा सल्ला नक्की लोकांपर्यंत पोहचवू आणि त्याप्रमाणे खरोखर स्वाकृत प्रमाणे मदतीचा वाटा पण घेवू.

तुमच्याशी गप्पा करतांना वेळ कसा गेला ते कळलंच नाही!! आज तुमचे वय ९३ वर्षे आहे. ईश्वर तुम्हाला भरपूर सुख संमृद्धी, दिर्घायुष्य आणि आनंद प्रदान करो ही प्रार्थना! "जीवेत शरदः शतम्" असे म्हणून तुमचा निरोप घेते.

धन्यवाद!!

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी
फोन नं. 9765079236
8308634751

हस्ताक्षर -
सौ रसिका देशपांडे

